# प्रेस नोट

## एम.टी.एन.एल.केबल चोरणाऱ्या आरोपींस रंगेहाथ पकडले बाबत.

**मालाड पोलीस ठाणे, गु.र.क्र. ४५१/२०२६, कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं**

दिनांक १६/०३/२०२६ रोजी १८:५० वाजताच्या दरम्यान पोलीस नियंत्रण कक्षाकडून आशिर्वाद बिल्डींग रोड नं २, लिबर्टी गार्डर परीसर येथे काही इसम एम.टी.एन.एल. केबल चोरी करीत असले बाबत कॉल प्राप्त झाला, सदर कॉलच्या अनुषंगाने मालाड ०१ मोबाईल रवाना करण्यात आली. मालाड ०१ मोबाईल वरिल सफौ सुर्यवंशी, पोह ०४०७६७ सुरज कदम,पोहवा. ९९०६३६ भुसांडे व मपोशि ११२१५६ कुटे, हे तात्काळ घटनास्थळी गेले असता, पोलीस गाडी पाहून तेथील इसम इकडेतिकडे पळून गेले त्यातील ०२ इसमास ताब्यात घेण्यात आले व त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यानी त्यांची नावे-१) शनाउल्ला कुन्नु खान, ३५ वर्षे, २) मजीबुल्ला खान वय २१ वर्षे असे सांगितले.

नमूद आरोपीतांकडून १० मिटर लांबीची कॉपर केबल अंदाजे किंमत ६०,०००/- रूपये व एकुण ०४ गोणी मध्ये १०० किलो वजनाची केबल मधुन काढलेली ताब्यांची तार किंमत १,२०,०००/-रूपये, चोरीसाठी वापरण्यात आलेला टेंम्पो असा एकुण ५,३०,०००/-किंमतीचा मुददेमाल ताब्यात घेण्यात आला.

सदर आरोपी व मुददेमाल ताब्यात घेवून पोलीस ठाणेस आले व एम.टी. एन,एल चे मॅनेजर श्री पुष्पराज सुरेंद्रचंद्र पारिख ४६ वर्षे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून मालाड पोलीस ठाणे गुरक्र. ४५१/२६ कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं २०२३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.नमूद दोन्ही आरोपीतास अटक करण्यात आली असुन आरोपीतांस दिनांक १९/०३/२०२६ पर्यत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. शशिकुमार मीना, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री संदीप जाधव, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-११ मुंबई, श्री.विजय भिसे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, दिंडोशी विभाग, मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दुष्यंत चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली मालाड १ मोबाईल वरिल स्टाफ, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि तुषार सुखदेवे व स्टाफ, तपासी अधिकारी पोउनि विष्णू गिरी यांनी केली आहे.

----------------000-----------------

Scanned with CamScanner